सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस अधीक्षक कार्यालय ,**

**यवतमाळ**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Email IDsp.yavatmal@mahapolice.gov.in

एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

दुरध्वनी क्र. ०७२३२ २५६७०१

जा.क्र. – पोअय/२०२५/ यवतमाळ.

दिनांक - दि. 07/02/2025

## प्रेसनोट

## यवतमाळ जिल्हा पोलिसांनी बेटी बचाव बेटी पढाओ नारा देत काढली रॅली

शासनाचे बेटी बचाव बेटी पढाओ या उपक्रमास दिनांक 22/01/2025 रोजी दहा वर्ष पूर्ण झाल्याने यवतमाळ जिल्हा पोलीस दलाकडून भरोसा सेल महिला सुरक्षा विशेष कक्ष कडून आज दिनांक 07/02/2025 रोजी सकाळी 11 वाजता महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांचे बेटी बचाव बेटी पढाओ या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीस मा. पोलीस अधिक्षक श्री. कुमार चिंता व उपविभागीय पोलीस अधिकारी बैसाने साहेब यांनी बेटी बचाव बेटी पढाओ या बाईक रॅलीस हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. " बेटी बचाओ बेटी पढाओ" उपक्रमांतर्गत यवतमाळ जिल्हा पोलीसांनी महिला शीक्षीत झाल्यास सासर आणी माहेरचा कशा पध्दतीने विकास करु शकते याबाबद माहिती दिली, तसेच महिलांचा सन्मान करणे, त्यांना शिक्षीत व सक्षम करण्याचे आवाहन करण्यात आले. सदर बाईक रॅली पोलीस मुख्यालय होऊन शहरातून परत पोलीस मुख्यालय कडे आली सदर वेळी सदर कार्यक्रमाच्या वेळी माननीय पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी बैसाने साहेब, असे हजर होते. बेटी बचाओ बेटी पढाओ रॅलीतुन लिंग-आधारित असमानता दूर करून मुलींचे रक्षण करणे यासह महिला सशक्तीकरण वाढवणे यासह अनेक समस्यांचे निराकरण करण्याचा संदेश देण्यात आला. तसेच मुलींचे शिक्षण आणि त्यांचा सामाजिक सहभाग या बाबद जनजागृती करण्यात आली.

रॅलीचे शुभारंभाकरिता मा.पोलीस अधीक्षक श्री. कूमार चिंता, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे, पोलीस निरीक्षक ज्ञानोबा देवकते, वाहतुक शाखा, हजर होते. बाईक रॅलीमध्ये महिला बाईक रॅलीमध्ये पोलीस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर, सहायक पोलीस निरीक्षक शुभांगी गुल्हाने, नीलिमा सातव, माधुरी उंबरकर यांचे सह १०० ते १५० महिला पोलिस अंमलदार यांनी उपस्थिती लावली. पोलीस मुख्यालय यवतमाळ येथून सदर रॅलीची सुरुवात करण्यात आली, बेटी बचाव बेटी पढाओ जनजागृती बाईक रॅली ही पोलीस मुख्यालय पासून सुरुवात करण्यात आली, तहसील चौक, अँग्लो हिंदी हायस्कूल, वीर वामनराव चौक, दाते कॉलेज चौक, आर्णी रोड, आर्णी नाका, संविधान चौक, दत्ता चौक, संत सेना चौक, नेताजी चौक, या रूट प्रमाणे पोलीस मुख्यालय येथे परत येऊन सांगता करण्यात आली.

SRulhane

शुभांगी रामभाउजी गुल्हाने

जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ

Scanned with OKEN Scanner